॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone: (02462) 215242 (Ext. - 152)
Fax:(02462) 215572

Website: srtmun.ac.in
email: affiliation@srtmun.ac.in

शैक्षणिक वर्ष २०२७—२०२८ करीता संलग्नीकरणाचे नुतनीकरण प्रस्ताव सादर न केलेल्या महाविद्यालयांची बैठक बाबत.

## :: महत्वाचे परीपत्रक ::

संदर्भ:०१.विभागाचे परीपत्रक क्रं.शैक्षणिक संलग्न—०३/२०२६—२७/४९०,दि.३१/०७/२०२६
०२.विभागाचे परीपत्रक क्रं.शैक्षणिक संलग्न—०३/२०२६—२७/५३१,दि.२१/०९/२०२६

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२७–२०२८ साठी महाविद्यालयाचे तात्पुरते, कायम संलग्नीकरण, तुकडी, नैसर्गिक वाढ, संशोधन केंद्र यांचे नुतनीकरणाचे प्रस्ताव हे ऑनलाईन ई समर्थ (E-Samarth) संगणकीय प्रणालीव्दारे ३०/०९/२०२६ पर्यंत महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११४ नुसार सादर करणे बाबत संदर्भीय परीपत्रक ०१ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

तसेच सदर प्रस्ताव व शुल्क आवश्यक पुरक कागदपत्रासह दि.३०/०९/२०२६ रोजी सलंग्नीकरण विभागास सादर करण्यात यावेत. सदर तारखेनंतर कोणत्याही परिस्थीतीत प्रस्ताव Online व्दारे व प्रत्यक्ष (Hard Copy) स्विकारल्या जाणार नाहीत असेही संदर्भीय परीपत्रक ०२ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

तथापी, वरील संदर्भीय ०१ व ०२ परीपत्रकाव्दारे कळवून सुध्दा अनेक महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२७—२०२८ साठी महाविद्यालयाचे नुतनीकरणाचे प्रस्ताव हे ई समर्थ (E-Samarth) या संगणकीय प्रणालीव्दारे विहीत मुदतीत सादर केलेले नाहीत. प्रस्ताव सादर न केलेल्या महाविद्यालयांपैकी काही महाविद्यालयांनी केलेल्या विनंतीनुसार अशा महाविद्यालयांचे मान्यताप्राप्त प्राचार्य, संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांची बैठक मा.कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली व मा.प्र. कुलगुरु महोदय यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.०८/१०/२०२६ (गुरुवार) रोजी सकाळी ११.०० वाजता मा.अधिसभा सभागृह, प्रस्तुत विद्यापीठ येथे आयोजीत करण्यात आलेली असून बैठकीस सर्व संबंधितांनी वेळेवर उपस्थित रहावे.

सदर बैठकीस संलग्नीकरण नुतनीकरणाचे प्रस्ताव सादर न केलेल्या ज्या महाविद्यालयांचे अध्यक्ष/सचिव व प्राचार्य उपस्थित राहणार नाहीत म्हणजे त्यांना आपले महाविद्यालयाचे नुतनीकरण करण्यात स्वारस्य नाही असे दिसून येते असे समजून अशा महाविद्यालयांचे टप्याटप्याने असंलग्नीकरण करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmu.ac.in या संकेतस्थळावर Circular-Affiliation याशिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड—४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न-०३/२०२६-२०२७/563
दिनांक:—०६/१०/२०२६

उपकुलसचिव
शैक्षणिक(संलग्नीकरण) विभाग

प्रत माहितीस्तव:
०१.मा.कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
०२.मा.प्र.कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ